# श्री मुक्तेश्वर विद्यालयात सायबर सेक्युरिटी कार्यशाळा संपन्न



औसा/प्रतिनिधी :

लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम मागील तीन वर्षांपासून लातूर जिल्ह्यामध्ये राबविला जात आहे.

या उपक्रमाअंतर्गत सायबर सेक्युरिटी कार्यशाळा औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये विद्यार्थ्यांसाठी साठी आयोजित करण्यात अली होती. या कार्यशाळेत शाहू महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील राजमाने राजकन्या व लगडे श्रावणी या विद्यार्थिनींनी सोशिअल मीडिया, इंटरनेटचा अयोग्य व अतिवापर वापर कसा घटक ठरतो, डिजिटल फसवणुकीपासून सावधानता कशी बाळगायची हे विविध उदाहरणे देऊन सांगितले. त्यासोबतच सायबर सेल, सायबर गुन्हा नोंदणी व हेल्पलाईन नंबर बद्दल माहिती दिली. शेवटी विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा अभिप्राय घेतला. याप्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापक जलसगरे सर व शिक्षकवृंद उपस्थित होते.